मोटार अपघात नुकसान भरपाई
अर्ज क्र.६५/२०२१
जुना M.A.C.P. क्र.१५२/२०१०
सागर खर्चे –वि.– पुरुषोत्तम खर्चे
**निशाणी क्र.९०**

## अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक २ याची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव– डॉ. मनोज सुधाकर पाटील,

वय– ४७ वर्ष, व्यवसाय– डॉक्टर, मानव हॉस्पीटल,

राहणार– मलकापूर, तालुका– मलकापूर, जिल्हा–बुलढाणा.

**सरतपास– अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. के.व्ही.परमार यांचेमार्फत शपथेवर सुरु...**

१. या प्रकरणाचे समन्स मला प्राप्त झाले होते. मी ते आज सोबत आणले आहे. मी २००२ पासुन वैद्यकीय व्यवसायामध्ये आहे. सागर खर्चे यांना मी ओळखतो ते आमच्याकडे पेशंट होते. ३०/१२/२००९ रोजी त्यांना आमच्या मानव हॉस्पीटलमध्ये भर्ती केले होते. त्यांच्या उजव्या पायाचा मांडीपासुन खालचा भाग यास क्रश इंजुरी होती. उजवी मांडी फाटलेली होती आणि जखमेमधुन रक्त वाहत होते. दोन्ही ठिकाणच्या जखमा ह्या गंभीर स्वरुपाच्या जखमा होत्या. आता मला निशाणी क्र.६२ दाखविण्यात आले. तो जखमांचा अहवाल मी स्वतः दिला होता. त्यावर माझी सही आणि शिक्का आहे. तो निशाणी क्र.६२ वर आहे.

२. जर एखाद्या व्यक्तीच्या पायावरुन ट्रॅक्टरचे चाक गेले आणि नंतर रोटाव्हेटर गेले तर चाकामुळे झालेली इजा दिसणार नाही. रोटाव्हेटरने झालेल्या जखमेमुळे ती दिसणार नाही. सागर याच्या पायास झालेल्या जखमा या ट्रॅक्टरचे चाक जावुन नंतर रोटाव्हेटर गेले तर होवु शकतात. आता मला दिनांक ०६/०२/२०१०

चे वैद्यकीय बिल दाखविण्यात आले. ते ३८५०/– रुपयांचे आहे. त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझा सही आणि शिक्का आहे. ते **<u>निशाणी क्र.९१</u>** वर आहे.

३. १३/०२/२०१० रोजीचे रुपये ४३६०/– बिल आता मला दाखविण्यात आले. त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझा सही आणि शिक्का आहे. ते **<u>निशाणी क्र.९२</u>** वर आहे. १९/०२/२०१० रोजीचे रुपये ४६५०/– चे बिल आता मला दाखविण्यात आले. त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझा सही आणि शिक्का आहे. ते **<u>निशाणी क्र.९३</u>** वर आहे. २६/०२/२०१० रोजीचे रुपये ५८५०/– बिल आता मला दाखविण्यात आले. त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझा सही आणि शिक्का आहे. ते **<u>निशाणी क्र.९४</u>** वर आहे. सागर यास हॉस्पीटलमधुन डिसचार्ज दिल्यानंतर दिलेले कार्ड आता मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यामधील मजकुर बरोबर आहे. ते **<u>निशाणी क्र.९५</u>** वर आहे. दिनांक ०१/०२/२०१० रोजी सागर याच्या उपचारावरील बिल देण्यात आले होते. ते आता मला दाखविण्यात आले होते. त्यावर माझी सही आणि शिक्का आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. ते **<u>निशाणी क्र.९६</u>** वर आहे. आज सागर न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास– गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. आर.व्ही.पाटील यांचेमार्फत सुरु...</u>**

४. जर एखादा व्यक्ती ट्रॅक्टर मागे रोटाव्हेटर चालु अवस्थेत असतांना पठीमागुन बसत असतांना त्याचा पायावरुन गेला तर सागरला झालेल्या जखमा होवु शकतात. जर ट्रॅक्टरचे चाक पायावरुन गेले तर तशा प्रकारच्या जखमा होवु शकत नाही. यंत्रामधुन पाय गेला असल्याने त्याची फरदळ उडाली होती. हे म्हणणे खरे आहे की, अशा व्यक्तींना कृत्रीम पाय लावुन ती व्यक्ती चालु शकते. सुरुवातीपासुन शेवटपर्यंत सागर याच्यावर मीच उपचार केले आहे. सागर याने कृत्रीम पाय लावला

आहे यासंबंधी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र २ ते अडीच महिन्यानंतर दिले होते.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2023.01.24 17:47:11 +0530

दिनांक : २४/०१/२०२३

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.

वाचुन पाहीले बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत नोंदविण्यात आला.)

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2023.01.24 17:47:16 +0530

दिनांक : २४/०१/२०२३

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.